# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
(पूर्वीचे सोलापूर विद्यापीठ)
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(Formerly Solapur University)


जा.क्र.सोविसो/पात्रता विभाग/परिपत्रक/२०२०-२१/ 3952 दि. -2 JUL 2020

प्रति,

मा.प्राचार्य /संचालक

सर्व संलग्नित महाविद्यालये, यांचे

मा. प्राचार्य/ संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक संकुले / विभाग

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : कोरोना ( Covid-19) च्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यार्थी / विद्यार्थीनींनी ऑनलाईन (Online) प्रवेशाची सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत..

संदर्भ : १) मा.मुख्य सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई यांचा विद्यापीठातील दि ०१ जून २०२० रोजी प्राप्त झालेला ई- मेल.
२) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे क्रमांक युएन आय/२०२०/बैठक /विशि-१/४१३१ A दिनांक ०८ मे, २०२०

महोदय / महोदया,

आपणास विदीतच आहे की, सद्यस्थितीत कोरोना ( Covid-19) च्या पार्श्वभूमीवर राज्यातील शैक्षणिक संस्था सध्या बंद आहेत. शासन पत्र क्र संकिर्ण -२०२० /प्र.क्र.१२३/विशि-३, दि. ०८/०५/२०२० नुसार शैक्षणिक वर्ष प्रथम वर्ष सोडून उर्वरित अभ्यासक्रम १ ऑगस्ट,२०२० पासून व प्रथम वर्ष १ सप्टेंबर २०२० पासून सुरु होत आहे. सध्या आपल्या राज्यात कोरोना रुग्णांची वाढ होताना दिसून येत आहे. यात भविष्यात सुधारणा होत गेली तरी राज्यात काही भागात १०० टक्के कोरोना संपेल याची खात्री देता येत नाही.या पार्श्वभूमीवर मा.मुख्य सचिव राजभवन,मलबार हिल, मुंबई यांचा विद्यापीठास मेल प्राप्त झाला . सदरच्या मेलमध्ये महाराष्ट्र राज्यात कोरोना ( Covid-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विद्यार्थी/ विद्यार्थिनींना ऑनलाईन (Online) प्रवेशाची सूविधा उपलब्ध करुन देण्याबाबत नमुद करण्यात आले आहे.

तेव्हा, उपरोक्त बाब लक्षात घेता विद्यार्थी / विद्यार्थिनींचे शैक्षणिक हित तथा आरोग्याची काळजी या साठी महाविद्यालय /विद्यापीठ शैक्षणिक संकुल / विभाग यांनी खालील प्रमाणे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने पार पाडायची आहे.

१. महाविद्यालयांनी आपल्या संकेतस्थळांवर प्रथम वर्ष प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठीचा अर्ज (Admission From) उपलब्ध करुन द्यावा.

२. कोरोना ( Covid-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यार्थी महाविद्यालयात न येता ऑनलाईन विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश ( Provisional Admission ) देण्यात यावा. तसेच शैक्षणिक शुल्क घेण्यासाठी Online Payment Getaway ची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क टप्प्याटप्प्याने कसे आकारण्यात येईल याची सुध्दा काळजी घ्यावी.

3. कोरोना ( Covid-19) च्या संदर्भात टाळेबंदी (Lockdown) उठल्यावर विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयात अध्यापनास येईल त्यावेळी प्रवेशासाठी आवश्यक असलेले मुळ कागदपत्रे ( Original Documents) तपासून नियमानुसार त्यांचा प्रवेश निश्चित व नियमित ( confirmed & regular) करावा.

४. व्दितीय व तृतीय वर्गाच्या प्रवेशाकरीता आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्यांकडून मागवून त्यानुसार ई-सुविधा मध्ये त्यांचे प्रवेश महाविद्यालयीन स्तरावर नियमित करावेत. सदरची प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांना महाविलयात न बोलविता ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करावयाची असून शैक्षणिक शुल्क घेण्यासाठी Online Payment Getaway ची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क टप्प्याटप्प्याने कसे आकारण्यात येईल याची काळजी सुध्दा घ्यावी.

५. महाविद्यालयामध्ये कोरोनाची टाळेबंदी उठल्यानंतर ज्यावेळी नियमितपणे अध्यापनाचे कामकाज सुरु होईल, त्यावेळी सर्व परिसरामध्ये, कार्यालयामध्ये तसेच क्लासरुममध्ये विद्यार्थी, पालक शिक्षक व इतर कर्मचारी एकत्र येणार नाहीत आणि शारीरिक अंतर राखण्याची काळजी घ्यावी. सर्वांना मास्क लावणे बंधनकारक असेल. महाविद्यालयामध्ये सर्वासाठी सॅनिटायझरचा तसेच सुविधायुक्त स्वच्छतागृहांची सोय असावी. नियमित आणि आवश्यकतेनुसार सर्व ठिकाणी स्वच्छता राखली पाहिजे.

६. कोरोना संक्रमण रोखण्यासाठी आणि त्याचा संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुचना परिसर कार्यालय तसेच क्लासरुम मध्ये लावणे आवश्यक आहे.

७. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम दि. ०१ सप्टेंबर, २०२० पासून सुरु करण्यात यावा.

८. प्रथम वर्ष सोडून उर्वरित अभ्यासक्रम १ ऑगस्ट,२०२० पासून ऑनलाईन पध्दतीने सूरु करण्यात यावेत.

❖ पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेश (Carry Forward) : शैक्षणिक वर्ष (२०२०-२१)

१. अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात / सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल. सदर तरतूद केवळ विद्यमान शैक्षणिक वर्षापूरती असेल.

२. मागील शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या (Year Down) विद्यार्थ्यांना उपरोक्त तरतूदीनूसार पुढील शैक्षणिक वर्षात / सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल.

३. उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांनी ते गैरहजर असणा-या किंवा अनुत्तीर्ण झालेल्या विषयांच्या परीक्षा जेव्हा त्या परीक्षांचे आयोजन होईल तेव्हा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

❖ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया ही मागासवर्गीय आरक्षणासंबंधीचे वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील याची नोंद सर्व संबंधित महाविलयाच्या प्राचार्यांनी घ्यावयाची आहे.

तेंव्हा सदरची बाब आपल्या अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक, तसेच महाविलयाचे कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून महाविद्यालयामध्ये वरील प्रमाणे प्रक्रिया राबविण्याची जाबाबदारी व्यवस्थित पार पाडावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.वि.मा.घुटे)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :

१) परीक्षा व मुल्यमापन मंडळ
२) वित्त व लेखा विभाग
३) एमकेसीएल विभाग